# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११००४

(सरळसेवा/पदोन्नतीच्या पदावर प्रतिनियुक्ती/उसनवारी तत्व)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (राज्य मंडळ), पुणे कार्यालयातील खालील तक्त्यात नमूद संवर्गातील सरळसेवा/पदोन्नतीची पदे शासकीय विभाग/स्थानिक स्वराज्य संस्था/महामंडळे/प्रधिकरणे इत्यादी संस्थामधील समकक्ष पदावर कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे मधून प्रतिनियुक्तीने भरावयाची आहेत. तरी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (राज्य मंडळ), पुणे कार्यालयात सरळसेवेच्या/पदोन्नतीच्या पदावर प्रतिनियुक्तीवर येण्यास इच्छूक अधिकारी/कर्मचारी यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | मंडळातील प्रतिनियुक्तीने भरावयाची पदे | संवर्ग | वेतनस्तर/वेतनश्रेणी | शासकीय विभाग/स्थानिक स्वराज्य संस्था/महामंडळे/प्रधिकरणे इत्यादी संस्थामधील समकक्ष पद | रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | संशोधन अधिकारी (अराजपत्रित) | गट–ब | S-20 Rs. 56100-177500 | समकक्ष पद | ०३ |
| २ | मुल्यमापन अधिकारी (अराजपत्रित) | गट–क | S-15 Rs. 41800-132300 | समकक्ष पद | ०५ |
| ३ | संशोधन सहायक (अराजपत्रित) | गट–क | S-14 Rs. 38600-122800 | समकक्ष पद | ०५ |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी इच्छूक समकक्ष पदावर काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचे लक्ष महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही–२०११/प्र.क्र.१३७/कार्यासन १२ दि. १७/१२/२०१६ मधील सूचना व अटी आणि शर्तीकडे वेधण्यात येत असून इच्छूक अधिकारी/कर्मचारी यांनी आपला अर्ज मा. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.नं. ८३२ए, फा.प्लॉट नं. १७८ व १७९, आघारकर रिसर्च इन्स्टिटयुट च्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, यांचेकडे दि. २३/१०/२०२६ पर्यंत टपालाद्वारे अथवा secretary.stateboard@gmail.com या ईमेल आयडी वर विहित कालावधीत कार्यालयीन वेळेत सादर करावा.

आवश्यक शैक्षणिक अर्हता

| पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|
| संशोधन अधिकारी | अ) कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची कला, वाणिज्य किंवा कृषी शाखेची पदवी किंवा पदव्युत्तर पदवी परीक्षेस किमान द्वितीय श्रेणी प्राप्त.<br>ब) शिक्षणशास्त्र पदवीमध्ये प्रथम किंवा द्वितीय श्रेणी प्राप्त आणि शिक्षणशास्त्रातील संशोधन किंवा संशोधन पदवी व प्रायोगिक शिक्षणशास्त्र हे विषय घेवून पदव्युत्तर पदवी किंवा शक्यतो एनसीइआरटी, नवी दिल्ली ने आयोजित केलेल्या संशोधन पध्दती प्रशिक्षण आवश्यक.<br>क) कोणत्याही भारतीय अथवा परदेशी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पीएचडी किंवा तत्सम मान्यताप्राप्त पदवी.<br>ड) माध्यमिक शिक्षणाशी संबंधित संशोधन कार्याचा पाच वर्षाचा अनुभव. |
| मूल्यमापन अधिकारी | १. अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची प्रथम श्रेणीत अध्यापन शास्त्रातील पदवी परीक्षा उत्तीर्ण (बी.टी/बीएड् इ.)<br>ब) मान्यताप्राप्त विद्यापीठाचे प्रथम श्रेणीत पदवी (बी.टी/बीएड् वगळून) किंवा द्वितीय श्रेणीत पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण (एम एड् वगळून) (गणित, शास्त्र, इतिहास, |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| | नागरिकशास्त्र, भूगोल विषयांसह)<br>क) मूल्यमापनाचे किंवा एनसीइआरटी, नवी दिल्ली तर्फे घेण्यात येत असलेले प्रशिक्षण प्राप्त.<br>ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>२. अ) अध्यापन शास्त्रातील पदव्युत्तर पदवी असल्यास प्राधान्य.<br>ब) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी मूल्यमापनाची कृतीसत्रे आयोजित करण्याचा, घटक चाचण्या घेण्याचा अनुभव. |
| संशोधन सहायक | मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा (संख्याशास्त्र विषयासह) अध्यापन शास्त्रातील पदवी (बी.टी/बीएड् इ.)<br>किंवा<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची अध्यापन शास्त्रातील पदवी व संशोधनाचा किंवा संख्याशास्त्र विषयक कामाचा पाच वर्षाचा अनुभव. |

कामाचे स्वरुप :– माध्यमिक व उच्च माध्यमिक (इ. ९ वी ते १२ वी) विषय योजना, अभ्यासक्रम, पाठयक्रम, पाठयपुस्तके, प्रशिक्षण आयोजन, मूल्यमापन योजना ठरविणे.

प्रतिनियुक्तीचा कालावधी :– किमान ०३ वर्षे

(डॉ. दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ, पुणे ४११००४

स्थळ :– पुणे ४११००४
दिनांक:– ०५/१०/२०२६

Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११००४

(सरळसेवा/पदोन्नतीच्या पदावर प्रतिनियुक्ती/उसनवारी तत्व)

## विवरणपत्र

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (राज्य मंडळ), पुणे कार्यालयातील संशोधन अधिकारी, मुल्यमापन अधिकारी व संशोधन सहायक ही पदे प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी विहित करण्यात आलेला नमुना.

| अ.क्र | तपशील | | | |
|---|---|---|---|---|
| १ | अर्जदाराचे संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) | | | |
| | सद्याच्या निवासाचा संपूर्ण पत्ता | | | |
| २ | पदनाम/संवर्ग<br>पदाची वेतनश्रेणी | | | |
| ३ | सध्याच्या कार्यालयाचे नाव व पत्ता व दुरध्वनी क्रमांक | | | |
| ४ | जन्म दिनांक (DD/MM/YYYY) | | | |
| ५ | शैक्षणिक अर्हता | | | |
| | ई-मेल आय.डी. | | | |
| ६ | भ्रमणध्वनी क्रमांक | | | |
| ७ | ज्या पदावर प्रतिनियुक्तीने जाण्यास इच्छूक आहे ते पद | | | |
| ८ | मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नये) | | | |
| ९ | संबंधित अधिकाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे किंवा कसे? तसेच, त्याच्याविरुध्द भ्रष्टाचार/लाचलुचपत गुन्हयासंदर्भातील प्रकरण, फैजदारी प्रकरण प्रलंबित आहे किंवा कसे? | | | |
| १० | माध्यमिक व उच्च माध्यमिक (इ. ९ वी ते १२ वी) विषय योजना, अभ्यासक्रम, पाठयपुस्तके, प्रशिक्षण आयोजन व मूल्यमापन योजना याबाबतच्या कामाचा अनुभव आहे काय? असल्यास तपशील. | | | |
| ११ | एकूण शासकीय सेवेचा कालावधी व केलेल्या कामाचा तपशील | | | |
| | कार्यालयाचे नाव | पदाचे नाव | कालावधी | केलेल्या कामाचा तपशील |
| अ | | | | |
| ब | | | | |
| क | | | | |
| १२ | संगणक हाताळणी बाबतचे ज्ञान आहे का, असल्यास तपशील | | | |
| १३ | इंग्रजी/मराठी टंकलेखन उत्तीर्ण व संगणकावर टंकलेखन येत असल्यास तपशील | | | |
| १४ | संबधित अधिकाऱ्याची निवड झाल्यास त्यास तात्काळ कार्यमुक्त करण्यात येईल किंवा कसे? | | | |
| १५ | संबंधित अधिकारी कार्यरत असलेल्या संवर्गामध्ये अर्ज अग्रेषित करण्याच्या दिनांकास १० टक्के पेक्षा अधिक पदे रिक्त आहेत किंवा कसे? | | | |

उपरोक्त अर्जात नमूद केलेली माहिती सत्य असून कोणतीही माहिती खोटी नाही. मंडळातील प्रतिनियुक्ती पदाचे कामकाज पार पाडण्यासाठी मंडळाच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य असून मी स्वखुशीने प्रतिनियुक्तीवर काम करण्यास तयार आहे.

अर्जदाराचे नाव, पदनाम व सही

Scanned with OKEN Scanner

सोबत कागदपत्रे:—

१. कार्यालयाचे/विभागाचे ना—हरकत प्रमाणपत्र

२. विभागीय चौकशी चालू/प्रस्तावित नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.

३. संगणक हाताळणी बाबतचे ज्ञान (MSCIT) उत्तीर्ण असलेबाबचे प्रमाणपत्र.

४. मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या साक्षांकित प्रती.

Scanned with OKEN Scanner